# कुख्यात गुंड शेरा पोलिसांच्या गोळीबारात ठार

देशोन्नोती. दि. ०५/११/२०१९

## ◆ प्रत्युतरादाखल पोलिसांनी केला गोळीबार ◆ शहरात दोन ठिकाणी केली होती लुटमार

**प्रतिनिधी** / ४ नोव्हेंबर



**नांदेड :** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या श्रीनगर भागातील मेट्रो शुज या दालनात घुसून पिस्तुलाचा धाक दाखवून नगदी रक्कमेसह ४५ हजार ९९२ रुपये किमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्यानंतर त्याच गुन्हेगारांनी काही वेळातच एका बियरशॉपीमध्ये तोच प्रकार घडविला. या प्रकरणात पोलिसांनी सिसीटीव्ही फुटेजची मदत घेवून एकास अर्ध्या तासातच अटक केली. तर यातील दुसऱ्या गुन्हेगाराला अर्धापुर तालुक्यातील बारसगाव शिवारातील शेतात असलेल्या आखाड्याला घेराव घातला. गुन्हेगाराने केलेल्या गोळीबाराच्या प्रत्युत्तरात पोलिसांनी गुन्हेगाराच्या दिशेने केलेल्या गोळीबारात शेरा नामक गुंड जागीच ठार झाला.

श्रीनगर भागातील मेट्रो नावाच्या बुटाच्या दुकानात ३ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास शेरासिंघ उर्फ शेरु दलबिरसिंग उर्फ काला खैरा (३०) व अजय उर्फ भोप्या, राजकुमार ढगे (२१) या दोघांनी प्रवेश केला. यावेळी गुन्हेगारांनी दुकानातील नौकरास पिस्तुलाचा धाक दाखवून गल्ल्यातील नगदी २१ हजार ७१४ रुपये, १० हजार रुपये किमतीचा मोबाईल, पॉकिट्स व बुटे असा एकुण ४५ हजार ९९२ रुपये किमतीचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेला होता. सदर घटना घडताच उपविभागीय पोलिस अधिकारी अभिजीत फस्के, भाग्यनगर ठाण्याचे पोनि अनिरुध्द काकडे व त्यांचे कर्मचारी दुकानातील सिसीटीव्ही फुटेज तपासत असतांनाच दुसरीकडे हेच गुन्हेगार नमस्कार चौक ते ग्यानमाता शाळेच्या मार्गावर असलेल्या परळे बियर शॉपीमध्ये गोंधळ घालत होते. त्यांनी या शॉपीमधून ३९ हजार ७१५ रुपये जबरीने काढून घेतले. याचवेळी भाग्यनगर पोलिस त्याच मार्गावर आरोपींचा शोध घेण्यासाठी पेट्रोलींग करीत असतांना शॉपीमधील प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. यावेळी पोलिसांनी अजय उर्फ भोप्या ढगे यास ताब्यात घेतले. पोलिसांचे वाहन पाहून शेराने मोटारसायकलवरुन धुम ठोकली. यावेळी पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. परंतू रस्त्यातच एक ॲटो अडथळा ठरला आणि शेरा एका छोट्या गल्लीतून फरार झाला.

त्यानंतर शेरा हा अर्धापुर तालुक्यातील बारसगाव शिवारातील एका आखाड्यावर असल्याची गुप्त माहिती पोलिस अधिक्षकांच्या विशेष पथकाला मिळाली. या माहितीवरुन पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर यांच्या आदेशावरुन स्थागुशाचे पोनि शिवाजी डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पांडूरंग भारती यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेतील संपुर्ण पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ४ नोव्हेंबर रोजी ५ वाजताच्या सुमारास शेरा लपून बसलेल्या आखाड्याला घेराव घातला. यावेळी शेराने पोलिसांच्या दिशेने पिस्तुलातून तीन गोळया झाडल्या. परंतू सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. त्यानंतर पोलिसांनी शेरावर केलेल्या गोळीबारात कुख्यात गुंड हा गंभीर जखमी झाला होता. त्यास अधिक उपचारासाठी नांदेडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता सोमवारी सायंकाळी त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान शहरात वाढती गुन्हेगारी ही व्यापाऱ्यांसह सामान्य नागरिकांसाठी मोठ्या धोक्याची होती. विद्यमान पोलिस अधीक्षक मगर यांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी विशेष पोलिस पथकाची नियुक्ती केली आणि त्याचाच परिणाम म्हणून शहरात धुमाकूळ घालणाऱ्या गुन्हेगाराचा पोलिसांनी खात्मा केला. पोलिसांच्या या कारवाईचे व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कौतूक केले असून हे राज्य गुन्हेगारांचे नसून पोलिस प्रशासनाचे आहे, हे दाखवून दिले आहे.

दरम्यान या संदर्भात आरोपीच्या मृत्यूविषयी किंवा पोलिसांच्या कारवाईविषयी कोणतीही माहिती पोलिस प्रशासनाकडून देण्यात आली नसली तरी रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी वरिष्ठ पोलिस अधिकारी तळ ठोकून होते. गुन्हेगार असलेल्या शेराचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असताना येथे शिघ्र कृतीदलाचे जवान तैनात करण्यात आले होते. पोलिसांनी कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी शहराच्या प्रमुख चौकात नाकाबंदी लावली आहे.

### अशी घडली गोळीबाराची घटना

शेरुसिंग उर्फ शेरा अर्धापूर तालुक्यातील बारसगाव शिवारातील आखाड्यावर लपून बसला होता. याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस अधिक्षक विजयकुमार मगर यांच्या विशेष पथकासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आखाड्याला घेराव घातला. परंतू पोलिस आल्याचे पाहून शेराने पोलिसांच्या दिशेने तीन गोळ्या झाडल्या. यावेळी पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल झाडलेल्या एकाच गोळीत शेरा जागीच कोसळला.

### एकीकडे पोलिसांकडून पंचनामा , दुसरीकडे त्याच आरोपींचा धिंगाना

श्रीनगर भागातील मेट्रो नावाच्या शोरुममध्ये पिस्तोलचा धाक दाखवून लुटल्यानंतर पोलिस शोरुममधील सिसीटीव्ही फुटेजची तपासणी करीत होते. याचवेळी सदर गुन्हेगार नमस्कार चौकातील बायपास मार्गावरील बियर शॉपीमध्ये धिंगाना घालत होते. याचवेळी पोलिसांनी अवघ्या अर्ध्यातासात एकास ताब्यात घेतले. तर पोलिसांचे वाहन पाहून शेरसिंघ उर्फ शेरा याने दुचाकीवर सुसाट वेगात धुम ठोकली होती.



**काल कुख्यात गुंड शेरा याने मेट्रो शोरूममध्ये शस्त्राचा धाक दाखवून लुट केली होती.**